10-6-14

# 'कमला'मध्ये नवे प्रोफेशनल कोर्सेस

## रिटेल मॅनेजमेंट अँड आयटी आणि फूड प्रोसेसिंग अँड मॅनेजमेंट पदवी अभ्यासक्रम



यावर्षीपासून बॅचलर ऑफ व्होकेशन अंतर्गत रिटेल मॅनजमेंट अँड आयटी आणि फूड प्रोसेसिंग अॅड मॅनजमेंट पदवी अभ्यासक्रम सुरू करत आहे. व्यासाग्रिक क्षेत्रातील गरज लक्षात घेऊन हा व्यावसायिक कोर्स सुरू करत आहे. त्याचा विद्यार्थिनींसाठी फायदा होईल.

- डॉ. क्रांतिकुमार पाटील
प्राचार्य, कमला कॉलेज

विद्यापीठ अनुदान आयोगाचा हा प्रकल्प चांगला असून विद्यार्थिनींसाठी हा कोर्स अत्यंत फायदेशीर ठरणार आहे. या कोर्सबरोबर त्यांना जॉब ट्रेनिंगही मिळणार आहे. त्यासाठी अधिकाअधिक विद्यार्थिनींनी प्रवेश घ्यावा.

- प्राचार्य रा. कृ. कणबरकर,
कार्यकारी अध्यक्ष, ताराराणी विद्यापीठ

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

विविध क्षेत्रात लागणारे मनुष्यबळ विकसित करण्यासाठी केंद्राच्या नॅशनल स्कीम क्वॉलिफिकेशन फ्रेमवर्क या नवीन उपक्रमांतर्गत कमला कॉलेजमध्ये बॅचलर ऑफ व्होकेशन अंतर्गत रिटेल मॅनेजमेंट अँड आयटी आणि फूड प्रोसेसिंग अँड मॅनेजमेंट पदवी अभ्यासक्रम यावर्षीपासून सुरू होत आहे. यूजीसीने १२ व्या योजनेत देशातील विविध विद्यापीठांतील कॉलेजमध्ये बॅचर ऑफ व्होकेशन हा ३ वर्षाचा पदवी व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करायला परवानगी दिली आहे.

कालानुरूप क्षमता आणि कौशल्य विकसित करणारे शिक्षण ही सध्या गरज आहे. एकीकडे पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेऊनही मुलांना नोकऱ्या मिळत नाहीत. दुसरीकडे तंत्रकुशल कामगार व नव्या औद्योगिकीकरणाच्या, वाढत्या सेवाक्षेत्राच्या गरजा भागवणारे मनुष्यबळ मिळत नाही. रिटेलिंग, फूड प्रोसेसिंग, हेल्थ केअर, शेती, फाउंड्री, मल्टिमीडिया या क्षेत्रातील संधी ओळखून तसे प्रशिक्षण देणे हे आजच्या शिक्षणपध्दतीसमोरचे आव्हान आहे. तेच ओळखून कमला कॉलेजमध्ये बॅचलर ऑफ व्होकेशन अंतर्गत रिटेल मॅनेजमेंट अँड आय.टी.. आणि फूड प्रोसेसिंग अँड मॅनेजमेंट पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. यासाठी यूजीसीकडून कॉलेजला १ कोटी ८५ लाख रूपये अनुदान मिळणार आहे. फूड टेक्नॉलॉजी, फूड प्रोसेसिंग अँड मॅनेजमेंट यासारखे अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना विविध उद्योगात करिअरच्या अनेक संधी उपलब्ध होऊ शकतात. मॉलमध्ये काम करण्यासाठी स्टोअर मॅनेजर, डिपार्टमेंट मॅनेजर, सेल्स प्लोअर, डिपार्टमेंट मॅनेजर, सेल्स प्लोअर, एक्झिक्युटिव्ह, मॉल मॅनेजर, टेक्निकल सपोर्ट मॅनेजर अशा विविध क्षेत्रात संधी आहे. स्वत:चा उद्योग व्यवसाय सुरू करण्यासाठीसुध्दा हा अभ्यासक्रम उपयुक्त ठरू शकतात.

### प्रवेशासाठी पात्रता

१२ वी उत्तीर्ण विद्यार्थिनी या कोर्सला प्रवेश घेऊ शकतात. कोर्स पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यास विद्यापीठाची बीए, बीकॉम., बीएसएप्रमाणेच बॅचलर ऑफ व्होकेशन ही पदवी मिळेल.

### प्रवेश प्रक्रिया

कमला कॉलेजमध्ये सध्या नाव नोंदणी सुरू करण्यात आली असून, शिवाजी विद्यापीठाकडून अभ्यासक्रम आल्यानंतर प्रवेश प्रक्रिया सुरू होणार आहे. नाव नोंदणी करणे आवश्यक आहे.

### जागा

रिटेल मॅनेजमेंट अँड आयटी व फूड प्रोसेसिंग अँड मॅनेजमेंट पदवी (प्रत्येकी ५०)

### प्रवेश फी

यूजीसीकडून तीन वर्षे अनुदान असल्यामुळे पहिली तीन वर्षे या कोर्सची फी माफक असणार आहे.